आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर या तीन देशांच्या दौऱ्यावर
- ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असल्याचं केंद्रीय अर्थराज्यमंत्र्यांचं लोकसभेत निवेदन
- तिन्ही सेनादलांची वित्तीय परिषद आज संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्या अध्यक्षते खाली सुरु
- देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाची हजेरी/ वायनाड मधे भूस्खलन स्थळी बचावकार्य सुरु
- पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ विशेष टपाल तिकिटांचा संच प्रकाशित

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनचा कांस्यपदकासाठी सामना

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्या आज फिजी मध्ये नाडी इथं पोहचल्या आहेत. त्या बुधवार पर्यंत फिजीमध्ये असतील. फिजीचे उपप्रधानमंत्री विलियम गावोका आणि फिजीमधले भारताचे उच्चायुक्त पी एस. कार्तिकेयन यांनी राष्ट्रपतींचं स्वागत केलं. या दौऱ्यादरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू फिजीचे राष्ट्राध्यक्ष काटोनिवेरे आणि प्रधानमंत्री सिटिव्हनी राबुका यांच्यासोबत बैठक घेणार आहेत. त्या फिजीच्या संसदेला संबोधित करणार असून नंतर फिजीमधल्या भारतीयांशी देखील संवाद

साधणार आहेत. तसंच राष्ट्रपती सुवा इथल्या गांधी मेमोरियल कॉलेज आणि नाडीमधल्या श्री शिव सुब्रमण्यम स्वामी मंदिरालाही भेट देणार आहेत. यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती ८ आणि ९ ऑगस्ट रोजी न्यूझीलंडमध्ये असतील. दौऱ्यादरम्यान त्या न्यूझीलंडच्या गव्हर्नर जनरल सिंडी किरो यांच्यासोबत बैठक घेणार असून त्या प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन यांचीही भेट घेणार आहेत. त्या वेलिंग्टन इथं आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदेला संबोधित करतील आणि ऑकलंडमधल्या भारतीयांशी संवाद साधतील. यात्रेच्या अंतिम टप्प्यात राष्ट्रपती १० ऑगस्टला पूर्व तिमोरला जातील. राष्ट्रपती पूर्व तिमोरचे राष्ट्राध्यक्ष जोस रामोस होर्टा यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतील. राष्ट्रपती पूर्व तिमोरचे प्रधानमंत्री के राला शनाना गुस्माओ यांचीही भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असून २०१४ मधे ७ लाख ३० हजार कोटी पतपुरवठा झाला होता त्या तुलनेत २०२४मधे २५ लाख ४६ हजार कोटी रुपये पतपुरवठा झाला अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत दिली. एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं की किसान क्रेडिट कार्डाच्या माध्यमातून २०१४ मधे शेतकऱ्यांना सव्वाचार लाख कोटीपेक्षा जास्त पीक कर्जं देण्यात आली तर २०२४ पर्यंत ही रक्कम ९ लाख ८२ हजार लाख कोटींपर्यंत पोहोचली. कृषी उत्पादन वाढण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्रसरकारने विविद उपक्रम हाती घेतले आहेत असं ते म्हणाले.
मुद्रा योजना आणि स्टार्टअप इंडिया अशा योजनांमधून सरकारने युवावर्गाच्या कल्याणाच्याही योजना राबवल्या असल्याचं त्यांनी सभागृहाला सांगितलं. लोकसभेत आज आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर

चर्चा होत आहे त्याचप्रमाणे गोवा विधानसभेत अनुसूचित जमातींना पुरेसं प्रतिनिधित्व देण्यासाठीचं पुनर्रचना विधेयक आज सभागृहात मांडलं जाऊ शकतं.

<><><><><>

देशातल्या विक्रमी गॅस उत्पादनाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातली आत्मनिर्भरता महत्वाची असल्यातं ते म्हणाले. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्या समाज माध्यमावरच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना त्यांनी म्हटलं आहे. २०२०- २१ मध्ये गॅसचे उत्पादन सुमारे २८ अब्ज ७० कोटी घनमीटर होतं. जे २०२३-२४ मध्ये वाढून सुमारे ३६ अब्ज ४३ कोटी घनमीटर झालं आहे. २०२६ पर्यंत देशात गॅसचं उत्पादन ४५ अब्ज ३ कोटी घनमीटर पर्यंत पोहचेल असा अंदाज आहे.

<><><><><>

देशाच्या तिन्ही सेनादलांची वित्तीय परिषद आज नवी दिल्लीत संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. संरक्षण दलांसाठीचा वित्तपुरवठा, आणि इतर वित्तविषयक बाबींमधे तिन्ही दलांचा ताळमेळ राखण्यावर या परिषदेत चर्चा होणार आहे. या उच्चस्तरीय परिषदेत संरक्षण मंत्रालयातले वरीष्ठ अधिकारी, संरक्षण लेखा विभागाचे वरीष्ठ अधिकारी सहभागी होतील. संरक्षण विभागाच्या आर्थिक बाबींशी संबंधित विविध घटकांचा दृष्टीकोन समजून घेणं आणि संरक्षण सामग्री खरेदीतल्या समस्यांवर तोडगा शोधणं अशा मुद्द्यांवर या परिषदेत विचारविनिमय होणार आहे.

<><><><><>

सहारा इंडिया रिअल इस्टेट कंपनी आणि सहारा हाउसिंग इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनमध्ये गुंतवणूक केलेल्या १७ हजार २५० गुंतवणूकदारांना आतापर्यंत

138 कोटी रुपये परत करण्यात आले आहेत, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पूरक प्रश्नांना उत्तर देताना त्या बोलत होत्या. सेबी आणि सर्वोच्च न्यायालयाने नेमून दिलेल्या समित्यांच्या नियमानुसार हे पैसे परत करण्यात आहेत, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली असून अनेक ठिकाणी आज अतिवृष्टीची शक्यता असल्याचं हवामानशास्त्रविभागाने कळवलं आहे. नागालँड, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, आणि सिक्किम इथं आज जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण, गोवा, मध्यमहाराष्ट्र, राजस्थानचा पश्चिम भाग, आणि उत्तरप्रदेशचा पूर्व भाग इथं हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज आहे. पंजाब, हरयाणा, चंडीगढ, आणि दिल्लीत तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. उत्तराखंड मधे उद्या आणि परवा तर अरुणाचल प्रदेशात येत्या बुधवार-गुरुवारी जोरदार पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

**<><><><><>**

केरळमधे वायनाड इथं दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर मृतदेह शोधण्याचं काम आज सातव्या दिवशीही सुरू आहे. या भागात शंभरहून अधिक जण बेपत्ता आहेत. काल ड्रोनच्या मदतीनं मृतदेह शोधण्याचं काम करण्यात येत होतं. दरड कोसळण्यापूर्वीच्या परिसराचा नकाशा आणि दरड कोसळल्यानंतर बदललेल्या स्थितीची तुलना करून शोध घेतला जात आहे. या कामासाठी सैन्याची अतिरिक्त कुमक आणि श्वानपथकाला मेरठहून पाचारण केलं आहे. मेपडी इथं ठेवलेल्या ६७ मृतदेहांपैकी ८ जणांवर अंत्यसंस्कार झाले आहेत. उर्वरित मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे, अशी माहिती आकाशवाणी प्रतिनिधीनं दिली आहे.

**<><><><><>**

**हिमाचल** प्रदेशातल्या काही भागांमध्ये आज मुसळधार पाऊस सुरु असून **सिमला आणि सिरमौर** जिल्ह्यांमधील काही भागांना हवामान विभागानं सतर्कतेचा इशारा दिला आहे. तसंच भूस्खलनाची शक्यता असलेल्या भागात पर्यटकांनी जाऊ नये अशा सूचना हवामान विभागानं पर्यटकांना आणि नागरिकांना दिल्या आहेत. **राजस्थानात** काही भागांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्यामुळं **अजमेर, जैसलमेर, टोंक, बारमेर, पाली , बालोत्रा आणि बूंदीसह** १३ जिल्ह्यांमधल्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसंच या विभागांमध्ये हवामान खात्यानं ऑरेंज अलर्ट जारी केला असून **जैसलमेर** मध्ये यलो अलर्ट जारी केला आहे. त्याबरोबरच **बालोत्रा, अजमेर** सारख्या जिल्ह्यांमधल्या काही भागांमध्ये सतत होणाऱ्या पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. **जोधपूरमध्ये** बोरानाडा परिसरात पहाटेच्या सुमारास कारखान्याची भिंत कोसळल्यामुळं १३ मजूर ढिगाऱ्याखाली अडकले. त्यापैकी तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीररीत्या जखमी झाला. काल रात्री जोधपूर इथल्या गोतावर धरणात बुडून एकाचा मृत्यू झाला आहे. गेले चार दिवस **मध्य प्रदेशात** मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळं दहा मोठ्या धरणांमधून पाणी सोडण्यात आलं असून नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

**<><><><><>**

केदारनाथ धाम यात्रा मार्गावर अडकलेल्या यात्रेकरूंचा शोध आजही सुरू आहे. या परिसरातलं हवामान स्वच्छ झाल्यानंतर आज सकाळी सुरक्षादलांच्या देखरेखीखाली एमआई १७ आणि चिनूक हेलीकॉफ्टरनं १०० जणांना रवाना करण्यात आलं आहे. त्याबरोबरच मंदाकिनी नदीच्या जवळच्या जंगलामध्ये सुरक्षा दलांची शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ आज टपाल विभागानं विशेष तिकिटांचा संच प्रकाशित केला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय उपस्थित होते. ऑलिम्पिक आणि या स्पर्धेत उतरलेल्या क्रीडापटूंना भारताचा पाठिंबा दर्शवण्याचा या टपाल तिकीट संचामागचा उद्देश असल्याचं दूरसंचार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनची कांस्यपदकासाठीची लढत मलेशियाच्या झी जिया ली याच्याशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता हा सामना होईल. भारताला या स्पर्धेतलं चौथं पदक मिळवून देण्यासाठी लक्ष्य सेन प्रयत्नशील असेल. याशिवाय नेमबाजी स्पर्धेत स्कीट मिश्र सांघिक प्रकारात महेश्वरी चौहान आणि अनंतजीत सिंह नरुका आज लक्ष्याचा वेध घेणार आहेत. टेबल टेनिस सांघिक प्रकारात उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान निश्चित करण्यासाठी श्रीजा अकुला, मनिका बत्रा आणि अर्चना कामत आज रोमानियाविरुद्ध लढत देत आहेत. ॲथलेटिक्समध्ये महिलांच्या ४०० मीटर स्पर्धेच्या पहिल्या फेरीत किरण पहल, तर ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात अंतिम फेरीत आशियाई स्पर्धेतला सुवर्णपदक विजेता अविनाश साबळे भारताचं प्रतिनिधित्व करतील. कुस्तीच्या मैदानात महिलांच्या ६९ किलो वजनी गटात उपउपांत्यपूर्व निशा दहिया मैदानात उतरेल. नौकानयन स्पर्धेत विष्णू सरवनन आणि नेत्रा कुमनन पुढच्या फेरीत जाण्यासाठी प्रयत्न करतील.

//<><><><><>//